श्रीदासराम ग्रंथमाला : पुष्प २३

श्रीरामनिकेतनमधील

# आराधना

ॐ

• संकलक आणि संपादक •
प्रा.डॉ.के.वा.आपटे

• प्रकाशक •
बाळासाहेब उर्फ अजित खंडेराव लोखंडे

आवृत्ति पहिली सांगली इ.स. २०११

श्रीदासराम ग्रंथमाला - पुष्प- २३

**श्रीरामनिकेतनमधील**

# आराधना

ARADHANA

**प्रकाशक** : अजित खंडेराव लोखंडे
७०५, गणपती पेठ, सांगली-४१६ ४१६
दूरध्वनी-(०२३३) २३२२७२९

**प्रथम आवृत्ति** : इ.स. २०११

**प्रकाशन दिन** : माघ शु.नवमी, शके १९३२
शनिवार, दिनांक १२/०२/२०११

**मुद्रक** : श्री. अनिल लोखंडे
श्रीदासराम ऑफसेट, सांगली.
दूरध्वनी-(०२३३) २३२२७२९

**मुखपृष्ठ व अक्षरजुळणी :** श्री. अनंत अजित लोखंडे

**प्रसाद मूल्य** : रु. १०/- मात्र

**पुस्तक मिळण्याचे ठिकाण** : श्रीरामनिकेतन,गांवभाग,सांगली.
०९८२२००७५२८

।। श्रीराम।।

## आशिर्वाद

परमार्थाचा जो आटापिटा आहे तो शेवट साधण्यासाठी आहे. "याचसाठी केला होता अट्टाहास । शेवटचा दिस गोड व्हावा ।" असे जगद्‌गुरु श्रीतुकाराममहाराज म्हणतात व शेवट केव्हा साधतो ते आमचे ती.प.पू.श्रीमामा सांगतात, "शेवट गोड तरी । अंती वाणी वदेल हरी ।।" आणि हा शेवट कसा साधता येतो ते श्रीतुकाराममहाराजांनी या निर्याणाच्या अंभागाद्‌वारे सांगितले आहे. ते हे निर्याणाचे अभंग आपल्या संप्रदायात संतमहात्म्यांच्या निर्याणाचे दिवशी म्हटले जातात.

असे हे आराधनेचे-निर्याणाचे अभंग श्री बाळासाहेब लोखंडे हे आपल्या ती. मातोश्रींच्या स्मरणार्थ प्रकाशित करीत आहेत हे अत्यंत औचित्यपूर्ण आहे.

आपलेही मरण आपल्याला साधता यावे याकरिता आत्तापासूनच भगवंताचे नाम घेतले पाहिजे तर शेवटी येण्याची शक्यता. याकरीता आपला प्राण आता चाललाच आहे तो एकदम कधी जात नाही, तो कसा जावा ही प्रार्थना जगद्‌गुरु श्रीतुकाराममहाराज यांच्या शब्दात श्रीदादांचे चरणी करतो.

रामराम म्हणता जावा माझा प्राण । एवढे कृपादान तुमचे मज ।।१।।
नको विद्या वय आयुष्य फारसे । नाही मज पिसे मुक्तिचेही ।।२।।
नको धन मान न वाढो संतान । मुखी नारायण प्राण जावा ।।३।।
तुका म्हणे दिन काकुलती येतो । तुज आळवितो पांडुरंगा ।।४।।

असे काही साधावे अशी प्रार्थना भगवान श्रीसद्‌गुरु श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस, माझे आजोबा ती.प.पू.श्रीमामामहाराज केळकर, माझे पितृदेव ती.प.पू.श्रीदादामहाराज केळकर यांचे चरणी करतो व शेवटी माझ्या मातोश्री ती.प.पू.सौ.सीतावहिनी केळकर यांना अभिवादन करून येथेच विराम घेतो.

सांगली — श्रीदादांचा कृपाभिलाषी
गणेश जयंती — **चंद्रशेखर**
७/२/२०११ — (चंद्रशेखर रामराय केळकर)

। श्रीराम।।

आपला चिमड संप्रदाय हा स्वरूप संप्रदाय असून साधनाच्या अभ्यासाने आपले संप्रदायातील अनेक सिद्‌धपुरुष ब्रह्मरूप (स्वरूपाकार) होऊन गेले. साधनच त्या सिद्‌धपुरुषांच्या आत सिद्‌ध झाले असलेने ते ब्रह्मरूप होतात. म्हणूनच 'सिद्‌ध साधनाने स्वये ब्रह्मचि झाले' असे आमचे केशवकाका माझे आजोबांचे आरतीत म्हणतात हे सार्थ आहे.

अशा या आपले संप्रदायातील सिद्‌धपुरुषानी आपले मरण कसे साधले याची आठवण त्यादिवशी (पुण्यतिथी दिवशी) व्हावी म्हणून आपले संप्रदायात या सिद्‌ध पुरुषांची पुण्यतिथी दिवशी आराधना करणेची पद्‌धत आहे.

श्रीतुकाराममहाराजांनी सदेह वैकुंठ गमन केले. त्यावेळी श्रीतुकाराममहाराजांनी चहू कोसावर आपले विमान थांबवून आपलेकरिता हे निजधामाचे अभंग पाठविले अशी आख्यायिका आहे. हे निजधामाचे अभंग आपले संप्रदायात सिद्‌धपुरुषांच्या पुण्यतिथी दिवशी म्हटले जातात.

अशा या सिद्‌धपुरुषांच्या पुण्यतिथी दिवशी सर्व साधकांना हे अभंग म्हणता यावेत म्हणून ते एकत्रित करून एक वेगळे पुस्तक छापावे अशी प्रेरणा आमचे प.पू.श्रीदादांचे शिष्य श्री बाळासाहेब लोखंडे यांना झाली व ती त्यानी बोलून दाखविली. 'मातृ देवो भव।' या वेदांतील उक्तीनुसार श्री लोखंडे हे आपले ती.आईचे स्मरणार्थ हे पुस्तक छापणार आहेत हे ऐकून मला अतिशय आनंद झाला. यानुसार हे पुस्तक प्रकाशित होत आहे.

हे पुस्तक सर्वांना श्रीरामनिकेतन मध्ये पठण करणेसाठी अथवा आपले घरी आराधना करावी असे वाटले तर घरी पठण करणेसाठी निश्चित उपयोगी पडेल यात शंका नाही.

**।। राजधिराज सद्‌गुरुनाथ महाराज की जय ।।**

माघ शु.तृतीया शके १९३२
प.पू.श्री.भाऊसाहेबमहाराज ऊमदीकर पुण्यतिथी — **दीपक चंद्रशेखर केळकर**
दि.०६/०२/२०११

**।। श्री सद्गुरु प्रसन्न ।।**

।। ॐ नमो भगवते वासुदेवाय ।।  ।। ॐ नमो श्रीदासरामाय नमः ।।

## - प्रकाशकाचे मनोगत -

आराधनेचे पुस्तक आपल्या हाती देतांना आनंद होत आहे. पुस्तकाच्या सुरुवातीला श्रीतुकाराममहाराजांचे अभंग आहेत. त्यात श्रीतुकाराममहाराजांनी मानवी जीवनातील अंतिम सत्याचा उलगडा केला आहे. याच्या पठणाने मानवी मनाला एक वेगळी चालना मिळते व मन शांततेकडे मार्गक्रमणा करते. या अभंगाला धरूनच श्रीचिमड्महाराजांनी श्रीनिंबरगीकरमहाराज यांच्या मार्गदर्शनाखाली निर्याणाच्या अभंगाची आखणी केली व त्याप्रमाणेच श्री सद्गुरु श्रीदासराममहाराजांनी आपल्या संप्रदायातील सिद्ध सत्पुरूषांच्या निर्याणाचे अभंगांची रचना केली. व हे सर्व ज्या त्या संतांच्या पुण्यतिथीस म्हणण्याची प्रथा चालू झाली. हा सर्व विषय सदर पुस्तकाच्या प्रास्ताविकमध्ये आलेला आहे.

माझी आई श्रीमती इंदूमती ह्या सर्वप्रथम श्रीदादांच्याकडे आल्या त्यावेळी त्यांना श्रीदादा हे प्रत्यक्ष तुकाराममहाराजांच्या रूपात खुर्चीवर बसलेले दिसले. असे तिने स्वतः आम्हास सांगितले. कालांतराने मी व आमचे बंधू श्री.सतिश खंडेराव लोखंडे दोघेही दादांच्याकडे येऊ लागलो. ही केवळ तिचीच पुण्याई.

माझे पितृदेव ती.प.पू.श्री.खंडेराव (काका) बळवंत लोखंडे यांच्या पहिल्या पुण्यतिथीस श्रीदादांच्या आज्ञेनुसार श्रीतुकाराममहाराजांच्या बारा अभंगाचे व त्यावरील श्रीदादांनी केलेल्या विवरणाचे **"श्रीतुकाराममहाराज नित्यपाठ"** हे पुस्तक प्रकाशित झाले. आता ती. मातोश्रींच्या स्मरणार्थ आराधनेचे जे पुस्तक प्रकाशित होत आहे त्याची सुरूवात ही श्रीतुकाराममहाराजांच्या निजधामाच्या अभंगाने होते. वरील सर्व घटनांची संगती पाहता ही सर्व महाराजांची योजना आहे असे वाटते.

सदर पुस्तक हे प.पू.श्रीअण्णा (श्री.चंद्रशेखर रामराय केळकर) यांच्या आशिर्वादाने व श्रीनाना (श्री.दिपकजी केळकर) यांच्या सहकार्याने व प्रयत्नाने साकार होत आहे. त्यांनी मला सेवेची संधी दिली त्याबद्दल मी त्यांचा कायमचा ऋणी आहे.

सदर पुस्तकाच्या छपाईच्या कामी माझ्या सर्व कुटुंबीयांचा मोलाचा हातभार आहे.

सदर पुस्तकास प्रा.डॉ.के.वा.आपटे यांनी प्रास्ताविक लिहून देऊन पुस्तकाचे संकलन व संपादन केले त्याबद्दल धन्यवाद !

शेवटी संप्रदायातील सर्व सिद्धसत्पुरूषांच्या व श्रीसद्गुरू दासराममहाराजांच्या चरणी साष्टांग दंडवत करून प्रकाशक या नात्याने दोन शब्द संपवितो.

बाळासाहेब ऊर्फ अजित खंडेराव लोखंडे.
सांगली.

## श्रीदासराममहाराजांची ग्रंथसंपदा

१) मनोहर विनायक मंगळवेढेकर यांचे ओवीबद्ध चरित्र................१९४०

२) श्रीज्ञानदेवतेहत्तिशी,सानंद टीकेसह,व तात्पर्यार्थसह श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा हरिपाठ...१९५२

३)श्रीज्ञानदेवमुद्राप्रकाश साधनमुद्रा टीकेसह, आणि ज्ञानेश्वरीसार..........१९६८

४) वायुलहरी, आणि ज्ञानदेव आज्ञापत्र (ओवीबद्ध भावार्थ)...........१९६९

५) ज्ञानेश्वरकृत दत्तस्तुति, श्रीदत्तस्तुतिप्रसाद ओवीबद्ध टीकेसह.........१९७१

६) श्रीज्ञानेश्वरकृत नमनस्तोत्र, भावार्थ नमनासह.........................१९७२

७) श्रीनारायणरावजीमहाराज यरगट्टीकर चरितामृत........................१९७३

८) श्रीनागाप्पाण्णामहाराज निंबरगीकर चरित्र.................(सन दिलेला नाही)

९) श्रीज्ञानेश्वरी चिंतनस्तोत्र व ज्ञानेश्वरी संकीर्तन स्तोत्र (भावार्थासह)...१९७४

१०) श्रीज्ञानेश्वरस्तोत्र.......................................................१९७५

११) सिद्धस्तुती..........................................................१९७७

१२) अमृतानुभव - मंगलाचरण, मंगलप्रसाद टीकेसह.....................१९७९

१३) तात्यासाहेब कोटणीसमहाराज चरित्र..................................१९८३

१४) श्रीसंत राधाबाई अक्का यांचे चरित्र.............................. (सन नाही)

१५) गुरुपाठ...............................................................१९८४

१६) सांप्रदायबोध........................................................ १९८४

१७) श्रीरामपाठामृत......................................................१९८४

१८) बाबासाहेब मुजुमदार यांचे चरित्र.......................................१९८४

१९) श्रीएकनाथी भागवत : संक्षिप्त पाठस्तोत्र..............................१९८७

२०) नित्यपाठामृत..........................................................१९८७

## श्रीदासराममहाराजांची ग्रंथसंपदा

२१) संजीवनपाठ..........................................................१९८७

२२) श्रीदासरामवचनामृत.................................................१९८७

२३) नासदीयसूक्त, भावार्थ संगति..........................................१९८८

२४) श्रीगोविंददर्शन..........................................................१९८८

२५) सांगली माहात्म्य ऊर्फ श्रीगंगाधरपंत चरितामृत........................१९८८

२६) श्रीदासरामगाथा........................................................१९८८

२७) श्रीतुकाराममहाराज नित्यपाठ, भावार्थ विवरण..........................१९८९

२८) श्रीगुरुमहिमा............................................................१९९१

२९) श्रीज्ञानेश्वरस्तोत्र व अन्य लघुग्रंथ......................................१९९७

३०) श्रीरामदासबोध.........................................................१९९७

३१) श्रीचांगदेवपासष्टी, एक नाम कला....................................१९९९

३२) परमार्थसार आणि अन्य ग्रंथ (उद्धवरावजी महाराज यरगट्टीकरांच्या चरित्रासह).....२००२

३३) परमार्थ प्रश्नोत्तरी, आवृत्ती पाहिली व दुसरी...........................२००२

३४) आरती संग्रह............................................................२००२

३५) चांगदेव पासष्टी व इतर ग्रंथ............................................२००२

३६) हरिपाठ संकीर्तन.......................................................२००७

३७)श्रीदासराममहाराज : श्लोकरचना........................................२०१०

३८)अनुभवामृत सम-ओवी-टीकेसह.......................................२०१०

३९)परमार्थ प्रश्नोत्तरी, आवृत्ती तिसरी.........................................२०१०

४०)आत्माराम (श्रीदासराममहाराजकृत गद्य अर्थासह).......................२०१०

## - प्रास्ताविक -

साक्षात्कारी संत हे विद्यमान जीवनातच ब्रह्माशी एकरूप होऊन मुक्त झालेले असतात त्यांना जीवन्मुक्त म्हणतात. पुढे प्रारब्धानुसार विद्यमान देह पडल्यावर ते विदेहमुक्त होतात. ज्या दिवशी ते देहत्याग करतात, तो दिवस पावन आणि पवित्र मानला जातो, त्याला त्या संतांची पुण्यतिथि असे म्हणतात. या पुण्यतिथि दिवशी त्यांचे पुण्यस्मरण करून, गुलाल व फुले उधळून त्यांना आदरांजलि वाहिली जाते.

पुण्यतिथीच्या दिवशी सकाळी कीर्तन/भजन करून दुपारी बारा वाजता गुलाल व फुले उधळल्यावर, आरती केली जाते आणि प्रसाद वाटला जातो. पुण्यतिथि साजरी करण्याची प्रायः ही पद्धति आढळते. परंतु या पद्धतीपेक्षा थोडी वेगळी पद्धत श्रीनिंबरगीकरमहाराजांनी घालून दिली आणि तीच पद्धत चिमड सांप्रदायिकांत प्रचलित आहे.

निंबरगीकरमहाराज हे महान संत कर्नाटकातील देव निंबरगी गावी वास्तव्य करून होते. त्यांचे पट्टशिष्य रघुनाथप्रिय साधुमहाराज या नावाचे होते. आपल्या गुरूचे अगोदर साधुमहाराजांनी चिमड या कर्नाटकातील गावात देह ठेवला. साधुमहाराजांचे मुख्य शिष्य होते रामचंद्रमहाराज यरगट्टीकर. त्यांनी साधुमहाराजांची समाधि चिमड येथे बांधली. त्यानंतर त्यानी साधुमहाराजांची पुण्यतिथि साजरी करण्याचे ठरविले. त्याबाबतीत त्यांना निंबरगीकरमहाराजांचे मार्गदर्शन लाभले, ते असे : पुण्यतिथीच्या कार्यक्रमास आराधना असे म्हणावयाचे. आराधनेचा प्रारंभ तुकाराममहाराजांच्या निजधामाच्या अभंगांच्या पठणाने करावयाचा. तुकाराममहाराजांचे निजधामाचे अभंग म्हणून सोळा अभंग उपलब्ध आहेत. ते म्हणून झाल्यावर 'रत्नजडित सिंहासन' आणि 'संतकृपा झाली' हे दोन अभंग म्हणावयाचे. त्यानंतर तुकाराममहाराजांचे निर्याण वर्णन करणारा जो अभंग आहे तो पठण करावयाचा. त्यानंतर दिवसाच्या ज्यावेळी त्या संताने निर्वाण केले त्यावेळी गुलाल व फुले उधळावयाची. मग आरती वगैरे करून प्रसाद वाटावयाचा.

तुकाराममहाराजांच्या निर्याणाचा अभंग पाहिल्यावर चिमडमहाराजांना वाटले की, असाच अभंग आपण साधुमहाराजांचे बाबतीत रचावा आणि तो म्हणावा. त्याप्रमाणे त्यांनी तो रचला आणि त्यानंतर निंबरगीकरमहाराजांनी सांगितल्याप्रमाणे चिमडमहाराजांनी साधुमहाराजांची पहिली आराधना केली.

काही काळ लोटला. चिमडमहाराज आणि निंबरगीकरमहाराजांच्या पट्टशिष्या श्रीलक्ष्मीबाई अक्का हे दोघे निजधामास गेले. तेंव्हा त्यांच्याही पुण्यतिथि साजऱ्या केल्या जाऊ लागल्या. त्यावेळी मात्र निर्याणाच्या अभंगाच्या पठणाच्या क्रमात थोडा बदल झाला. तुकाराममहाराजांचा निर्याणाचा अभंग म्हणून झाल्यावर, चिमड संप्रदायातील काही संताच्या निर्याणाचे अभंग त्यांच्या कालक्रमाने म्हणून झाल्यावर, ज्या संताची आराधना आहे, त्यांच्या निर्याणाचा अभंग म्हणावयाचा. त्यानंतर अन्य काही पदे व आरत्या म्हणावयाच्या.

या सुधारीत पद्धतीने श्रीदासराममहाराजांच्या श्रीरामनिकेतनमध्ये आराधना केल्या जातात. श्रीरामनिकेतनमध्ये जे अभंग, पदे, आरत्या, इत्यादि म्हटले जातात, त्यांचा संग्रह प्रस्तुत पुस्तकात ग्रथित केला आहे.

**– प्रा.डॉ.के.वा.आपटे.**

❖ श्रीदासराम ग्रंथमाला पुष्प यादी ❖

| पुस्तकाचे नांव | पुष्प क्रमांक | सन |
|---|---|---|
| चिमड संप्रदाय | १ | २००५ |
| श्रीरामदासस्वामी चरित्र | २ | २००६ |
| भजन तरंग | ३ | २००६ |
| हरिपाठ संकीर्तन | ४ | २००७ |
| श्रीदासराममहाराज नित्यपाठ चरित्र | ५ | २००७ |
| दासबोधातील तत्त्वज्ञान | ६ | २००७ |
| श्रीदासराममहाराजांचा वचनसंग्रह | ७ | २००८ |
| श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज चरित्र | ८ | २००९ |
| साधन संध्या | ९ | २००९ |
| अनंत अमृत स्मरण | १० | २००९ |
| श्रीगुरु महिमा | ११ | २००९ |
| श्रीज्ञानेश्वरी प्रसाद | १२ | २००९ |
| श्रीदासराम गाथा : पुरवणी | १३ | २००९ |
| श्रीदासराममहाराज आत्मचरित्र | १४ | २०१० |
| श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर यांचे चरित्र | १५ | २०१० |
| श्रीदासराममहाराज : श्लोकरचना | १६ | २०१० |
| ज्ञानदेवकृत अनुभवामृत ओवी टीकेसहीत | १७ | २०१० |
| श्रीदासराममहाराज सहस्रनामस्तोत्रम् | १८ | २०१० |
| आत्माराम (श्रीदासराममहाराजकृत गद्य अर्थासह) | १९ | २०१० |
| श्रीगुरुलिंगगीता (कानडी लिपीत) | २० | २०१० |
| श्रीगुरुलिंगगीता (मराठी लिपीत) | २१ | २०१० |
| श्रीरामनिकेतन (परिचय पत्रिका) | २२ | २०११ |

।। श्रीसद्‌गुरु प्रसन्न ।।

(१)

## श्रीतुकाराममहाराजांचे निर्याणाचे अभंग

**प्रथम नमन माझे स्वामि श्रीसद्‌गुरूसी ।।**
**अचल स्फूर्ति देई वरुनि हृत्तापनाशी ।।**
**वससि हृदयि माझ्या नित्यरूपा प्रकाशी ।।**
**सदय वरद होसी शांत करि बा मनासी ।।१।।**

– चिमडमहाराज

– १ –

घरीची दारीची सुखी तुम्ही नांदा ।
वडिलांसी सांगा दंडवत ।।१।।
मधाचिये गोडी माशी घाली उडी ।
गेली प्राप्त घडी पुन्हा नये ।।२।।
गंगेचा तो ओघ सागरासी गेला ।
नाही मागे आला परतोनी ।।३।।
ऐसिया शब्दाचा बरा हेत घरा ।
उपकार करा *तुकयावरी* ।।४।।

– २ –

सखे सज्जनहो घ्या रे रामनाम ।
संगे येतो कोण निश्चयेसी ॥१॥
आमुचे गावीचे जरी रत्न गेले ।
नाही सांगितले म्हणाल कोणी ॥२॥
म्हणोनिया जरी तुम्हा करितो ठावे ।
न कळे तरी जावे पुढे वाटे ॥३॥
इतक्यावरी रहाल जरी तुम्ही मागे ।
*तुका* निरोप सांगे विठोबासी ॥४॥

– ३ –

आहे सवघड आमुची ही वाट ।
नाही घाट बेट वाटेवरी ॥१॥
जकातीचा गुंता नाही वाटेवरी ।
मार्ग मोकळे चारी यावे जावे ॥२॥
ऐसे ज्या भोगणे आहे जया सुख ।
तयाने विन्मुख होऊ नये ॥३॥
पडाल संकटी भवसागर शोका ।
कोणे जन्मी *तुका* सापडेना ॥४॥

– ४ –

पताकांचा भार मृदंगाचा घोष ।
जाती हरिदास पंढरीसी ॥१॥



लोकांची पंढरी आहे भूमीवरी ।
आम्हा जाणे दूरी वैकुंठासी ॥२॥
काही केल्या तुम्हा उमजेना वाट ।
म्हणूनि बोभाट करुनि जातो ॥३॥
मागे पुढे रडाल कराल आरोळी ।
मग कदाकाळी *तुका* न ये ॥४॥

– ५ –

बसा रे गडे हो आज्ञा द्यावी आम्हा ।
आमुच्या रामनामा धरा चित्ती ॥१॥
उपकार करा पतित उद्धरा ।
वारंवार स्मरा रामनाम ॥२॥
व्हा रे वारकरी वेगे जा पंढरी ।
निरोप महाद्वारी एवढा सांगा ॥३॥
*तुका* आमुचे गावी होता तो आपुला ।
नाही कोठे गेला पायावीण ॥४॥

– ६ –

उठा सकळ जन भेटू तुम्ही आम्ही ।
लक्ष लावू नामी विठोबाच्या ॥१॥
लहान थोर सारे आशीर्वाद घ्यारे ।
बोळवीत या रे इंद्रायणी ॥२॥
येथून आमुचा खुंटलासे मार्ग ।

तुम्ही कृपा लोभ असू द्यावा ।।३।।
तुम्हासाठी जीव होतो कासावीस ।
कोणी हरिदास निवडेना ।।४।।
*तुका* म्हणे आता सोडा याची चिंता ।
निरोप मागुता द्यावा आम्हा ।।५।।

– ७ –

सकळिकांचे पायी माझे दंडवत ।
आपुलाले चित्त शुद्ध करा ।।१।।
सकळही माझी बोळवण करा ।
परतोनी घरा जावे तुम्ही ।।२।।
धर्म अर्थ काम झाले एके ठायी ।
मेळविले तेही हातोहाती ।।३।।
वाढविता लोभ होईल उशीर ।
अवघे रहा स्थिर ठायी ठायी ।।४।।
*तुका* म्हणे आता झाली हेचि भेटी ।
उरल्या त्या गोष्टी बोलायाच्या ।।५।।

– ८ –

निरोप दिधल्या न पहावे मागुते ।
पुढलीया पंथे उरकावे ।।१।।
थोड्यासाठी मागे ठेवू नये घोर ।
करावा परिहार आपोआप ।।२।।



पोट भरल्यावरी न बोलाव्या गोष्टी ।
भ्रम अन्न पोटी घेऊ नये ।।३।।
देवाज्ञा झालीया न ठेवावी वासना ।
दुश्चित या मना आणू नये ।।४।।
*तुका* म्हणे मार्ग शुद्ध केला चित्ती ।
येतो काकुलती मनी धरा ।।५।।

–९–

अहो उल्लंघिली लाज । तेणे साधियेले काज ।।१।।
हरिनामाची सांगडी । भावे बांधिली आवडी ।।२।।
अहो नाचू पैलतीरी । पार गेलो भवसागरी ।।३।।
अहो पार झाला *तुका* । उरली वाचा मारी हाका ।।४।।

– १० –

जाऊ देवाचिया गावा । देव देईल विसावा ।।१।।
देवा सांगू सुखदुःख । देव निरसील तहान भूक ।।२।।
घालू देवावरी भार । देव सुखाचा सागर ।।३।।
राहू जवळ देवापाशी । हात जोडूनि पायापाशी ।।४।।
*तुका* म्हणे आम्ही बाळ । या या देवाशी लडिवाळ ।।५।।

– ११ –

इतक्यामध्ये माळ घातली माळणीने ।
जवळी अवसान नाही झाले ।।१।।
गुडघ्याइतुका गेला हो विरोन ।

आपोनारायण साठविला ।।२।।
कांतेलागी म्हणे उपकार करी ।
झाले ऋण भारी जाता जाता ।।३।।
पदर फाडोनी दिला माळणीला ।
एवढिया बोला तारी मज ।।४।।
पदर फाडोनी दिला माळणीहाती ।
तेव्हा विजयमूर्ती संतोषली ।।५।।
*तुका* म्हणे अक्षय तुष्टमान झाला ।
दिवस हा गेला सोनियाचा ।।६।।

– १२ –

सर्व हित झाले एक असे मनी ।
एवढी विनवणी ऐका तुम्ही ।।१।।
आमुचिये कांता तुमचे पदरी ।
दया इजवरी असो द्यावी ।।२।।
ठायीची चपळ तोंडाची फटकळ ।
मजसाठी वर्दळ सोसा हीची ।।३।।
पसरितो पदर धरितो दाढी ओठी ।
अन्याय मजसाठी पोटी घाला ।।४।।
अहो पांडुरंगा फेडा हिचे ऋण ।
उपकार बोलणे बोलतो की ।।५।।
देवोनी साकी बाकी *तुका* मार्गी झाला ।
पदर दिधला माळणीसी ।।६।।



– १३ –

या नामाचा घोष वाजती घंटिका ।
सुरू झाला डंका तिही लोकी ।।१।।
शब्दाचा विश्वास झाली आळवण ।
करा बोळवण सज्जन हो ।।२।।
आले विष्णुदूत आली विठ्ठलमूर्ती ।
निजावसान हाती सापडले ।।३।।
झाला पाठमोरा इंद्रायणीजवळी ।
नाम घोष टाळी वाजविली ।।४।।
प्रथम तो पाय घातला पाण्यात ।
राहिली ही मात *तुका* म्हणे ।।५।।

– १४ –

आता जातो आम्ही दया असो द्यावी ।
सकळिका सांगावी विनंती माझी ।।१।।
बाड वेळ झाला उभा पांडुरंग ।
वैकुंठा श्रीरंग बोलवितो ।।२।।
अंतकाळी आम्हा विठ्ठल पावला ।
कुडीसहित झाला गुप्त *तुका* ।।३।।

– १५ –

ध्यानी मनी नाम दाटले अपार ।
प्रेमळ हे नीर ओसरले ।।१।।

तेव्हा माझे रूप निजरूपी मिळाले ।
धन्य धन्य केले तिही लोकी ।।२।।
तुझिया कीर्तीची वाजलीसे घंटा ।
*तुका* तो एकटा घालविला ।।३।।

– १६ –

लक्ष्मीसहित उतरले विमान ।
उदकावरी येवोन स्थिरावले ।।१।।
अंगणी होतो तो आले बोलावणे ।
समस्ता कारणे सांगितले ।।२।।
कीर्तन करीत चालिलो तेथून ।
करीत होतो ध्यान विठोबाचे ।।३।।
कीर्तन करीत इंद्रायणी तीरी ।
वानित होतो थोरी विठोबाची ।।४।।
ब्रह्मा विष्णू रुद्र आले तिघेजण ।
घेतले उचलोन मज विमानी ।।५।।
तेव्हा तुमच्या नेत्रां झापड पडली ।
विमाने चालली आकाशमार्गी ।।६।।
चहू कोसावरी स्तंभविले विमान ।
लिहिले हे जाण पत्र तुम्हा ।।७।।
आम्हा अंतकाळी विठ्ठल पावला ।
कुडीसहित झाला गुप्त *तुका* ।।८।।



– १७ –

रत्नजडित सिंहासन । वरी बैसले आपण ।।१।।
कुंचे ढाळिती दोही बाही । जवळी राही रखुमाई ।।२।।
तेथे नाना उपचारी । ऋद्धी सिद्धी ते कामारी ।।३।।
हाती घेवोनी पादुका । उभा बंदी जन *तुका* ।।४।।

– १८ –

अहो संतकृपा झाली । इमारत फळा आली ।।१।।
ज्ञानदेवे रचिला पाया । उभारिले देवालया ।।२।।
नामा तयाचा किंकर । त्याने केला हा विस्तार ।।३।।
जनार्दनाचा एकनाथ । ध्वजा लाविली भागवत ।।४।।
भजन करा सावकाश । *तुका* झालासे कळस ।।५।।

***



## श्रीमत् सद्‌गुरु परमपूज्य तुकाराममहाराज यांचे निर्याण

शालिवाहन शके पंधराशे एकाहत्तर ।
विरोधी संवत्सर उत्तरायण ।।१।।

फाल्गुन वद्य द्वितीया आणि सोमवार ।
प्रथम प्रहर प्रातःकाळी ।।२।।

तयेवेळी प्रथम कीर्तन करिता ।
म्हणे मज आता निरोप द्यावा ।।३।।

तुका म्हणे नमन साधुसंतपाया ।
ऐसे बोलोनिया गुप्त झाला ।।४।।

✻



# श्रीरामनिकेतनमध्ये पठण केले जाणारे निर्याणाचे अभंग



## श्रीमत् सद्‌गुरु परमपूज्य रघुनाथप्रिय साधुमहाराज चिमड, यांचे निर्याण

मंगळवार, चैत्र शुद्‌ध ३, शके १८०१

ता.२५ मार्च १८७९, (संध्या.५ वाजता)

ऐका हो सज्जन अठराशे एकात ।
झालासे एकांत देव साधू ।।१।।

साधुमहाराजांनी ठेवियला देह ।
चैत्र शुद्‌ध पाहे तृतीये दिवशी ।।२।।

दिवसा चौथे प्रहरी केले हो निर्याण ।
स्वरूपी तल्लीन ऐक्य झाले ।।३।।

ऐक्य झाले तेणे दिवस गोड झाला ।
जनी या जोडला नारायण ।।४।।

नारायणरूपी मिळोनिया गेले ।
कीर्तिरूपे उरले *दासापाशी* ।।५।।

– चिमडमहाराज



**श्रीमत् सद्‌गुरू परमपूज्य नारायणराव भाऊसाहेब महाराज ऊर्फ श्रीगुरुलिंगजंगममहाराज, निंबरगीकर, (देव) निंबरगी, यांचे निर्याण**

शुक्रवार, चैत्र शुद्‌ध १२, शके १८०७
ता. २७ मार्च १८८५,
(रात्री ११ वाजता )

शालिवाहन शके अठराशे सातात ।
पार्थिव संवत्सरात उत्तरायण ॥१॥
चैत्र शुद्‌ध द्वादशी आणि भृगुवार ।
रात्रौ द्वितीय प्रहर पाचवे तासी ॥२॥
तयेवेळी स्वये अभंग म्हणोनी ।
स्वरूपी मिळोनी ऐक्य झाले ॥३॥
नारायणरूपी नारायण झाले ।
कीर्तिरूपे उरले *दासापाशी* ॥४॥

–चिमडमहाराज





**श्रीमत् सद्‌गुरु परमपूज्य रामचंद्रावजी यरगट्टीकरमहाराज, चिमड, यांचे निर्याण**

शुक्रवार, मार्गशीर्ष शुद्‌ध ११, शके १८१३
ता.११ डिसेंबर १८९१,
(रात्रौ ९-४५ वाजता )

शालिवाहन शके अठराशे तेरात ।
खर संवत्सरात उत्तरायण ॥१॥
मार्गशीर्ष मासी शुद्‌ध एकादशी ।
भृगुवासरेसी चवथे तासी ॥२॥
श्रीरामरायांनी केले हो निर्याण ।
स्वरूपी तल्लीन ऐक्य झाले ॥३॥
ब्रह्मरूपी राम मिळोनिया गेले ।
कीर्तिरूपे उरले *दासापाशी* ॥४॥

– तात्यासाहेब कोटणीसमहाराज



**श्रीमत् सद्गुरु परमपूज्य लक्ष्मीबाई आक्कासाहेब महाराज, चिमड, यांचे निर्याण**

बुधवार, आश्विन शुद्ध ३, शके १८१९

ता.२९ सप्टेंबर १८९७,

(स.१० वाजता)

शालिवाहन शके अठराशे एकोणिसात ।
हेमलंबी संवत्सरात दक्षिणायन ॥१॥

आश्विन शुद्ध तृतीया आणि बुधवार ।
द्वितीय प्रहर चौथे तासी ॥२॥

लक्ष्मीबाई अक्कांनी केले हो निर्याण ।
स्वरूपी तल्लीन ऐक्य झाले ॥३॥

परब्रह्मरूपी मिळोनिया गेल्या ।
कीर्तिरूपे उरल्या *दासापाशी* ॥४॥

– तात्यासाहेबमहाराज कोटणीस





**श्रीमत् सद्गुरू परमपूज्य तीर्थरूप हणमंतरावजी कोटणीसमहाराज, सांगली, यांचे निर्याण**

रविवार, पौष वद्य ६, शके १८४५

ता.२७ जानेवारी १९२४,

(संध्या. ५ वाजता)

ऐका हो सज्जन अठराशे पंचेचाळिसात ।
रुधिरोद्गारी संवत्सरात उत्तरायण ॥१॥

हनुमंतरायांनी ठेवियला देह ।
पौष वद्य षष्ठी आणि रविवार ॥२॥

दिवसा चौथे प्रहरी केले हो निर्याण ।
स्वरूपी तल्लीन ऐक्य झाले ॥३॥

ऐक्य झाले तेणे दिवस गोड झाला ।
जनी या जोडला नारायण ॥४॥

रामरूपी हनुमंत मिळोनिया गेले ।
कीर्तिरूपे उरले *दासापाशी* ॥५॥

– दादामहाराज कोटणीस



## श्रीमत् सद्गुरु परमपूज्य गोविंद अनंत ऊर्फ बापूरावजी तथा श्रीमामामहाराज केळकर, सांगली, यांचे निर्याण

सोमवार,माघ शुद्ध ९, शके १८८३

ता.१२ फेब्रुवारी १९६२

(रात्रौ ११.५० वाजता)

शालिवाहन शके अठराशे त्र्याऐंशीत ।
प्लव संवत्सरात उत्तरायण ।।१।।
माघ शुद्ध नवमी आणि सोमवार ।
रात्रौ द्वितीय प्रहर तिसरे तासी ।।२।।
गोविंदरायांनी केलेसे निर्याण ।
अखंड कीर्तन सत्य केले ।।३।।
एकांती लोकांती देहांतीही नाम ।
प्रचीती उत्तम स्वये दिली ।।४।।
श्रीराम जयराम जय जय राम ।
संदेश परम निर्वाणीचा ।।५।।
हनुमंतरूपी मिळोनिया गेले ।
कीर्तिरूपे उरले *दासरामी* ।।६।।

– दासराममहाराज





## ती. मातोश्री इंदिराबाई केळकर, सांगली, यांचे निर्याण

सोमवार, माघ शुद्ध ४, शके १८८४

(दुपारी ३ वाजता)

शालिवाहन शके अठराशे चौऱ्याऐंशीत ।
शुभकृन्नाम संवत्सरात उत्तरायण ।।१।।
माघ शुद्ध चतुर्थी आणि सोमवार ।
दिवसा चतुर्थ प्रहर पहिले तासी ।।२।।
इंदिरामातेने केले हो निर्याण ।
अभंगी तल्लीन ऐक्य झाले ।।३।।
तुकोबारायांचे अभंग जे बारा ।
नित्य पाठ पुरा केला नेमे ।।४।।
अंतरात्मरूपी मिळोनिया गेल्या ।
कीर्तिरूपे उरल्या *दासरामी* ।।५।।

– दासराममहाराज



**श्रीमत् सद्‌गुरु परमपूज्य नारायणमहाराज यरगट्टीकर, चिमड, यांचे निर्याण**

सोमवार, माघ शुद्ध १०, शके १८८७

ता. ३१ जानेवारी १९६६

(सायं. ७.३० वाजता)

शालिवाहन शके अठराशे सत्त्याऐंशी ।
विश्वावसु संवत्सर उत्तरायण ।।१।।

माघ शुद्ध दशमी आणि सोमवार ।
रात्रौ प्रथम प्रहर दुसरे तासी ।।२।।

नारायणरावांनी केले हो निर्याण ।
साधनी निमग्न ऐक्य झाले ।।३।।

साधुदेवालय कळस वंदून ।
सोडियेले प्राण निजसत्ते ।।४।।

परब्रह्मरूपी मिळोनिया गेले ।
कीर्तिरूपे उरले *दासापाशी* ।।५।।

– दासराममहाराज





**श्रीमत् सद्‌गुरु परमपूज्य रघुनाथ हणमंत ऊर्फ बाबूरावजी कोटणीसमहाराज (दादासाहेब), सांगली, यांचे निर्याण**

रविवार, भाद्रपद शुद्ध ६, शके १८९५

ता.२ सप्टेंबर १९७३

(सकाळी ७.१५ वाजता)

शालिवाहन शके अठराशे पंचाणवात ।
प्रमादी संवत्सरात दक्षिणायन ।।१।।

भाद्रपद शुद्ध षष्ठी आणि रविवार ।
प्रथम प्रहर दुसरे तासी ।।२।।

रघुनाथराये केलेसे निर्याण ।
स्वरूपी तल्लीन ऐक्य झाले ।।३।।

ऐक्य झाले तेणे दिवस गोड झाला ।
जनी या जोडला नारायण ।।४।।

हनुमंतरूपी मिळोनिया गेले ।
कीर्तिरूपे उरले *दासापाशी* ।।५।।

– दासराममहाराज



**ती. सौ. सीतावहिनी केळकर, सांगली, यांचे निर्याण**

गुरूवार, फाल्गुन शुद्ध १०, शके १९०४

ता. २४ मार्च १९८३

(दुपारी १२.५० वाजता )

शालिवाहन शके एकोणीसशे चारात ।
दुंदुभि संवत्सरात उत्तरायण ।।१।।

फाल्गुन शुद्ध दशमी आणि गुरुवार ।
दिवसा तृतीय प्रहर पहिले तासी ।।२।।

सीतावहिनींनी केलेसे निर्याण ।
मनात स्मरण रामनाम ।।३।।

गोविंदजयंती गुरुपुष्यामृत ।
योग हा विख्यात साधियेला ।।४।।

सच्चिदानंदरूपी मिळोनिया गेल्या ।
कीर्तिरूपे उरल्या *दासापाशी* ।।५।।

– प्रा.डॉ.के.वा.आपटे





**श्रीमत् सद्गुरु परमपूज्य श्रीरामराय गोविंद केळकर तथा दासराममहाराज, सांगली, यांचे निर्याण**

बुधवार, श्रावण शुद्ध ६, शके १९२३

दि.२५ जुलै २००१,

(सायंकाळी ७.४० वा.)

शालिवाहन शके एकोणीसशे तेविसात ।
वृष नाम संवत्सरात दक्षिणायन ।।१।।

श्रावण शुद्ध षष्ठी आणि बुधवार ।
रात्रौ प्रथम प्रहर दुसरे तासी ।।२।।

श्रीदासरामांनी केले हो निर्याण ।
मुखात वचन नित्यकीर्तनाचे ।।३।।

दासरामांलागी कीर्तनाचा ध्यास ।
परमार्थी प्रकाश पाडियेला ।।४।।

लेखन प्रवचन नित्याचे कीर्तन ।
यामध्ये रममाण झाले साधू ॥५॥
जन्मतिथी षष्ठी निर्वाणतिथी षष्ठी ।
जन्ममरणाची गाठी पडियेली ॥६॥
आत्मारामी राम मिळोनिया गेले ।
स्मृतिरूपे उरले *केशव* मनी ॥७॥

– प्रा.डॉ.के.वा.आपटे

***

**भजन पूजन साधुनि बळे । जिंकियेले कळिकाळ ॥१॥**
**अहो गर्जतीती तिन्ही । टाळ ऐकताती कानी ॥२॥**
**जड देह कैसा घेऊनी । गेला *तुकाराम* वाणी ॥३॥**

**॥ राजाधिराज श्रीसद्गुरुनाथ महाराज की जय ॥**

## – पद –

प्रेमभरे आजि गाऊया ॥ गुरुमूळपीठा ॥ प्रेमभरे आजि गाऊया ॥
प्रेमभरे आजि गाऊ, चरणि जडुनि वर घेऊ ॥
वर हा देईल गुरुराया, ब्रह्मस्वरूपी क्रीडे म्हणुनि ॥ध्रु॥
सोमेश्वर पिंडीपासुनी, जगी प्रथम रेवणसिद्ध जन्मुनी ॥
मुक्तपणे राहुनि जनी, तत्त्वबोधे अज्ञ तारुनी ॥
मरुळसिद्धरूप धरुनि, मोंगलाई वास प्रभू ॥१॥



तृतीय काडसिद्ध सन्मुनी,अतिमोदभरे सिद्धगिरी वसति साधुनी ॥
सिद्धस्थान घोर वनी, स्वस्वरूपी ऐक्य पावुनि,
नारायणराव शिष्य, स्थापि निंबर्गिग्रामी बोधुनि ॥२॥
विषयसंग पूर्ण त्यागुनि, गुरुचरणि सदा तनु मन प्राण वाहुनी,
स्वात्मबोधे आत्मरूप, होऊनि विचरे जनी वनी,
मोक्षलक्ष्मी लक्ष्मीबाई ,अक्का नामे धन्य कन्या ॥३॥
ब्रह्मचारी वीतरागी जो, सच्छिष्य रघुनाथप्रिय साधुराय तो,
रामराय *गोपाळनाथ*, तख्त चिमड ग्रामी विलसे,
परमार्थपेठ लुटुनि, मुक्त करीत अमित प्राणिया ॥४॥

– गोपाळकाका कोटणीस

## – पद –

मंगल धामी । या झालो जंगम आम्ही ॥ध्रु॥
घेऊनि गुरु-गुह्याची दीक्षा । मागतो कोरान्नाची भिक्षा ।
अलक्ष लेवुनि त्या रुद्राक्षा । ना रतू कामी ॥१॥
षड्रिपु जाळुनि केली राख । विभूति तेचि अंगी देख ।
घेउनि ज्ञान शुभ्र शंख । फुंकू नामी ॥२॥
येता जाता शिवस्मरणासी । करुनि मारले त्या मरणासी ।
पर्वत शिखरी प्रभुलिंगासी । पहातो नेमी ॥३॥
साठावरची कळ लाधलो । शिवशिव चिंतने शिवचि झालो ।
*गोपालनाथ* पायी वितरलो । अवघे तू मी ॥४॥

– गोपाळकाका कोटणीस

### – पद –

चिमडक्षेत्री सद्गुरुमाई । जगदुद्धारा तिष्ठत राही ।।ध्रु।।
रघुनाथप्रिय गुरुवर त्राता । कैवल्याचा पूर्ण प्रदाता ।।१।।
रामचंद्रप्रभु दीनोद्धर्ता । घोर भवाचे शासनकर्ता ।।२।।
मोक्ष–लक्ष्मी आक्का माउली । जन ताराया उभी राहिली ।।३।।
गुरुलिंगजंगम स्वामिकृपेची । छाया सर्वा परोपरीची ।।४।।
संसारी जन फिरता श्रमले । भवभय वारुनि मुक्तचि केले ।।५।।
हरिनामाची माला दिधली । आत्मस्वरूपी वृत्ती वेधली ।।६।।
स्थावर जंगम भरली पाही । *दासा* दैवत त्याविण नाही ।।७।।

– तात्यासाहेबमहाराज कोटणीस

****

# आरत्या

### श्रीरामेश्वर

आरती माडतेनू रामेश्वर श्रीसोमेश्वरनाथा ।
रेवण मरुळ श्रीकाडसिद्ध गुरुलिंगा भगवंता ।।ध्रु।।
रघुनाथप्रिय रामचंद्र नारायण हनुमंता ।
सिद्धानंदन अवतारा श्रीदेवा गुरुनाथा ।।१।।
सर्वात्मक नीनू प्रणवस्वरूप नीनू जगदोळू इंथा ।
*प्रल्हादे*यू दया माडिदी गवियू हृदयस्था ।।२।।



### नारायणराव भाऊसाहेब निंबरगीकरमहाराज ऊर्फ गुरुलिंगजंगममहाराज

आरती नारायणा । धन्य जगज्जीवना ।
सगुण ब्रह्ममूर्ती । काय तपोनिधाना ।।ध्रु.।।
सद्गुरु काडसिद्ध । तुकाराम अवतार ।
साधन सांप्रदाय । वाढविला बडिवार ।।१।।
गुरुलिंगजंगम नावे । जगप्रसिद्ध जहाला ।
*दासराम* शरण येता । अंतरिये बोध केला ।।२।।

– श्रीदासराममहाराज

*

### श्रीबापूरावजी केळकर ऊर्फ मामामहाराज केळकर (श्रीदासरामांचे पिताजी)

आरती गोविंदा । नित्य कीर्तनानंदा ।
सच्चिदानंदकंदा । गुरुलिंग साधु बोधा ।।१।।
हनुमंत सद्गुरु आज्ञे । केले अखंड कीर्तन ।
सर्वस्व वेचियेले । समर्पिले पंचप्राण ।।२।।
ब्रह्मचैतन्यादी संत । भाऊराव समर्थ ।
रामचंद्र नारायण । नाम बोधी हे कथीत ।।३।।
श्रीराम जय राम जय जय राम । तेरा अक्षरे परम ।
संदेश निर्वाणीचा । पायी लोळे *दासराम* ।।४।।

– श्रीदासराममहाराज

## श्रीदासराममहाराज केळकर

आरती रामराया । करी कृपेची छाया ।
दावोनी दीनी दया । धन्य धन्य महाराया ।।ध्रु।।
सद्गुरु हनुमंत । पिता गोविंद संत ।
बोधी गुरुलिंग सिद्ध । धरुनि रूप सिद्धानंद ।।१।।
सिद्धसाधनाने । स्वये ब्रह्मचि झाले ।
भावादरे *केशवाने* । चरणी मस्तक ठेविले ।।२।।

– प्रा.डॉ.के.वा.आपटे

## श्रीसद्गुरु

सुखसहिता दुःखरहिता निर्मल एकांता ।
कलिमलदहना गहना स्वामी समर्था ।
नकळे ब्रह्मादिका अंत अनंता ।
तो आम्हा सुलभ तू जय कृपावंता ।।१।।
जयदेव जयदेव जय करुणाकरा ।
आरती ओवाळू सद्गुरू माहेरा ।
जयदेव जयदेव ।।ध्रु।।
मायेविण माहेर विश्रांती ठाव ।
शब्दी अर्थी लाभ बोलणे वाव ।
सद्गुरूप्रसाद सुलभ उपाव ।
रामी *रामदासा* फळला सद्भाव ।।२।।
जय देव जय देव ।

– रामदासस्वामी



## श्रीज्ञानेश्वरमहाराज

आरती ज्ञानराजा । महा कैवल्य तेजा ।
सेविती साधुसंत । मनु वेधिला माझा ।।ध्रु।।
लोपले ज्ञान जगी । हित नेणती कोणी ।
अवतार पांडुरंग । नाम ठेविले ज्ञानी ।।१।।
कनकाचे ताट करी । उभ्या गोपिका नारी ।।
नारद तुंबरू हो । साम गायन करी ।।२।।
प्रगट गुह्य बोले । विश्व ब्रह्मचि ठेले ।
*रामाहो जनार्दनी* । पायी ठकची ठेले ।।३।।

– रामा जनार्दन

✻

## श्रीतुकाराममहाराज

आरती तुकारामा । स्वामी सद्गुरु धामा ।
सच्चिदानंद मूर्ती । पाय दाखवी आम्हा ।।ध्रु।।
राघवे सागरात । पाषाण तारिले ।
तैसे या तुकोबाचे । अभंग रक्षिले ।।१।।
तुकिता तुळणेसी । ब्रह्म तुकासि आले ।
म्हणोनि *रामेश्वरे* । चरणी मस्तक ठेविले ।।२।।

– रामेश्वर भट

## रघुनाथप्रिय साधुमहाराज

आरती साधुराया । ब्रह्मरूप गुरूराया ।
समर्थ रामदासा- । ऐसी लखलखीत काया ।।ध्रु।।

गुरूलिंगजंगमांनी । देव करूनि बैसिविले ।
चिमड महाराजे । तापनाशी स्थापियेले ।।१।।

हनुमंत सद्‌गुरूंनी । रथयात्रे आराधिले ।
*गोविंदसुत रामे* । चरणशिरी वंदिले ।।२।।

– श्रीदासराममहाराज

✻

## रामचंद्रमहाराज यरगट्टीकर (चिमड महाराज)

आरती रामचंद्रा । महाविष्णु अवतार ।
भेटी होय हनुमंता । थोर दयासागर ।।ध्रु।।

निंबरगीमहाराज । म्हणती तुवा एकनाथ ।
येणेचि कळले हो । कोण आपण निभ्रांत ।।१।।

रघुनाथप्रिय साधु । हस्त मस्तकी ठेविला ।
सहज साधनाचा । संप्रदाय दाविला ।।२।।

पंचपदी श्रुतिगर्भ । स्तोत्र तुम्ही कथिले ।
*दासराम* प्रेमे गाता । जीवन हे उजळे ।।३।।

– श्रीदासराममहाराज



## लक्ष्मीबाई अक्का

मोक्ष लक्षुमी अक्का जगती अवतरली ।
अखंड चिन्मय ज्योती तेवत जी ठेली ।
आहार निद्रा नाही काया शोषियली ।
गुरुलिंग जंगम कृपे नामी समरसली ।।१।।

जय देवी जय देवी जय लक्ष्मीबाई ।
ओवाळीतो आरती प्रेमे तव पायी ।।ध्रु।।

चिमड सांप्रदाया वरदायी झाली ।
भक्तजनालागी मार्गदर्शी ठरली ।
कीर्ती पहाता कैसी विश्वी दुमदुमली ।
*दासराम* हे ठेवी मस्तक पदकमली ।।२।।

– श्रीदासराममहाराज

✻

## हणमंत पांडुरंग कोटणीस (तात्यासाहेब महाराज)

सद्‌गुरू भक्तीचा डंका गाजवुनी ।
कीर्तनी डोलविला गुरु राम ज्यांनी ।
संसारी दाविला सदाचार करुनी ।
गुरुरूपी तन्मय झाले काया संहरुनी ।।१।।

जय देव जय देव जय गुरु हनुमंता ।
तारी जड जीवा या श्रीलक्ष्मीकांता ।।ध्रु।।

*राम* लीन झाला धन्य तुझे चरणी ।
ओवाळी आरती तन मन वाहुनी ।
मायबाप तुम्ही असता कैची दीन वाणी ।
उरेल माझेपाशी सांगा देव धणी ।।२।।

– श्रीदासराममहाराज

✻

## इंदिराबाई केळकर (श्रीदासरामांची माता)

हनुमत् सद्गुरुची कृपा तुवा झाली ।
साधनी या रत होऊनी अखंडची ठेली ।
आहार थोडा असुनी पतिसेवा केली ।
गोविंद पति लाभे भली भाग्यशाली ।।१।।

जय देवी जय देवी इंदिरा माते ।
ओवाळू आरती तुजला गुणवंते ।।ध्रु।।

बारा अभंग तेरा वेळा तू म्हणसी ।
विठ्ठलदर्शन तुजला धन्य धन्य होसी ।
अभीष्ट साधुनी मनीचे गुरुपदी या वससी ।
*दासराम* हा वंदीत तव पदकमलासी ।।२।।

– श्रीदासराममहाराज

✻



## नारायणमहाराज यरगट्टीकर

आरती चिम्मडेशा । नारायण गुरुराया ।
दावी साधकांसी दया । धन्य मंगल महाराया ।।१।।

सद्गुरु बळवंत । पिता रामचंद्र संत ।
मायाळू सीता मात । सदा साधनी रत ।।२।।

साधनाच्या सायासाने । नारायणरूप झाले ।
म्हणोनी *केशवाने* । भावे तया नमीले ।।३।।

– प्रा.डॉ.के.वा.आपटे

✻

## र.ह.कोटणीस ऊर्फ दादामहाराज कोटणीस

आरती रघुनाथा । श्रेष्ठ हनुमंत सुता ।
सद्गुरु पितृदेव । भाग्य जोडे समर्था ।।ध्रु।।

कैवल्य–धामी तुवा । त्रयमूर्ती स्थापियेली ।
तेथेचि वास करून । उपासना चालविली ।।१।।

कैवल्य कीर्तन हे । पुण्यकाल आगळा ।
हनुमंत षष्ठीचा तो । घडे अपूर्व सोहळा ।।२।।

हनुमान समाधि ये । तुम्ही विश्रांती घेतली ।
*दासरामा* आठविली । हनुमंत माऊली ।।३।।

– श्रीदासराममहाराज

## सौ. सीतावहिनी केळकर

जयदेवी जयदेवी जय सीता शक्ती ।
भक्तीमुक्ती वत्सल तू करूणामूर्ती ।।ध्रु।।

सीता साध्वीमाता वात्सल्य सिंधू ।
अगाध छाया माया परमार्थी बोधू ।।
कुंकुम मळवट लेवुनी सौभाग्य कांती ।
अहेवलेणे दावी अंबाई शक्ती ।।१।।

तेजोमूर्ति झळके प्रकाश नामाचा ।
चंद्रसूर्य अनल अनिल रामाचा ।।
जन्ममृत्यू गूज दावी गुरूभक्ती ।
नारायण हनुमंती विसावली दीप्ती ।।२।।

टाळ मृदंग दिंडी पूजा आणि आरती ।
तुळशी वाहुनि उजळू कर्पूर ज्योती ।।
ज्योती ज्योत मिळाली नामी अद्वैती ।
पूर्ण निमाली भ्रांती दावी निजभक्ती ।।३।।

पूर्ण प्रसन्न वदनी गोविंद धामी ।
दासरामी रंगली सौभाग्य लक्ष्मी ।।
दास करी चरणी हीच विनंती ।
प्रेमे द्यावी साधन संकीर्तन प्रीती ।।४।।

– प्रा.डॉ.दा.वि.कुलकर्णी

✻



## – श्लोक –

कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा
बुद्ध्यात्मनावाप्रकृतिस्वभावात् ।
करोमि यद्यत्सकलं परस्मै
नारायणायेति समर्पयामि ।।१।।

✻

## जयजयकार

**।। राजाधिराज श्रीसद्गुरुनाथ महाराज की जय।।**

**।। हनुमान गुरु की जय ।।**

**।। रघुनाथप्रिय साधुमहाराज की जय ।।**

**।। श्रीसद्गुरु श्रीगुरुलिंगजंगममहाराज की जय ।।**

**।। श्रीसद्गुरु श्रीमामामहाराज की जय ।।**

**।। इंदिरा गोविंद की जय ।।**

**।। श्रीसद्गुरु श्रीदासराममहाराज की जय ।।**

**।। रामसंजीवनी सीतामाता की जय ।।**

**।। मंगलमूर्ती मोरया ।।**

✻✻✻

## – सांप्रदायाची आरती –

आरती सांप्रदाया । प्रेमभावे वंदूनिया ।
ओवाळीन संतराया । विनवोनी सदया ।।१।।

अगाध काडसिद्धा । शिवस्वरुप प्रसिद्धा ।।
माया ही मर्दियेली । काय वानू महासिद्धा ।।२।।

जय जया नारायणा । जीवीचिया जीवना ।
साकार ब्रह्मतनू । गुरुलिंगा निधाना ।।३।।

लक्षुमी अक्का भली । आदि शक्ती शोभली ।
आहार निद्रा नाही । नामी रंगली माऊली ।।४।।

रघुनाथप्रिय साधू । गुरु आज्ञे करी बोधू ।
ब्रह्मचारी त्यागमूर्ती । थोर सामर्थ्य सिंधू ।।५।।

धन्य धन्य रामचंद्र । महाविष्णु अवतार ।
साधन सांप्रदाय । गुरुभक्ती बडिवार ।।६।।

नारायण गुरुपीठ । हनुमंत वरिष्ठ ।
*गोविंदसुत रामी* । नामावली चोखट ।।७।।

–श्रीदासराममहाराज

## आराधनेचे कार्यक्रम

| अ.क्र. | कार्यक्रमाचे नांव | तिथी | विशेष कार्यक्रम |
|---|---|---|---|
| १. | श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज पुण्यतिथि | चैत्र शु.३ | आराधना दु. ४ ते ५ |
| २. | श्रीनिंबरगीकरमहाराज पुण्यतिथि | चैत्र शु.१२ | आराधना रा. १० ते ११ |
| ३. | श्रीदासराममहाराज केळकर पुण्यतिथि | श्रावण शु.६ | आराधना सायं ७ ते ८ |
| ४. | महायोगिनी लक्ष्मीबाईअक्का पुण्यतिथि | आश्विन शु.३ | आराधना स. ९ ते १० |
| ५. | श्रीरामचंद्रमहाराज यरगट्टीकर पुण्यतिथि | मार्गशीर्ष शु.११ | आराधना रा. ९ ते १० |
| ६. | श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस पुण्यतिथि | पौष शु.६ | आराधना दु. ४ ते ५ |
| ७. | सौ.इंदिराबाई केळकर पुण्यतिथि | माघ शु.४ | आराधना दु. ३ ते ४ |
| ८. | श्रीमामामहाराज केळकर पुण्यतिथि | माघ शु.९ | आराधना रा. ११ ते १२ |
| ९. | श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर पुण्यतिथि | माघ शु.१० | आराधना सायं. ७ ते ८ |
| १०. | तुकाराम बीज | फाल्गुन व.२ | आराधना स.९ ते १० |